E-Paper: www.vidharbhsatyajeet.in

RNI-MAHMAR-2023/88726

दैनिक विदर्भ सत्यजीत

LIVE NEWS

प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख | मुख्य संपादक :- उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111/9921746611 | कार्यकारी संपादक योगेश सौभागे

बुलढाणा. वर्ष ३ रे ,अंक १७५वा, वार शुक्रवार६ फेब्रुवारी२०२६ पाने ५ किंमत ४ रुपये

# शिक्षणामुळे जीवन यशस्वी होते - कासम भाई गवळी



## – पिर मोहम्मद उर्दु हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची परंपरा २४ वर्षापासून कायमच !

## – लावलेल्या छोट्याशा वृक्षाचा वटवृक्ष झाला! – १० आणि १२ च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न




मेहकर अलीकडच्या काळामध्ये शिक्षण क्षेत्रात कमालीच्या स्पर्धा वाढल्या आहेत मात्र या स्पर्धेच्या युगामध्ये शिक्षण घेणे अतिशय महत्त्वाचे आहे शिक्षणामुळेच देशाची व जगाची माहिती मिळते आपल्या जीवनात जर यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षण घेणे अतिशय गरजेचे आहे शिक्षणामुळेच जीवन यशस्वी होते असे पीर मोहम्मद उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष कासम भाई गवळी यांनी सांगितले पीर मोहम्मद उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची शिक्षक व विद्यार्थी घेत असलेल्या मेहनतीमुळे गेल्या २४ वर्षापासून यशाची परंपरा कायमच आहे पीर मोहम्मद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी आज रोजी उच्च पदावर पोहोचले आहेत एक छोटासा वृक्ष लावला होता मात्र आज शिक्षक पालक व विद्यार्थी व संस्थेच्या संचालक मंडळाच्या मेहनतीमुळे आज मोठा वटवृक्ष झाल्याचा आनंद आहे अजूनही ही संस्था भरघोस यश प्राप्त करून आपल्या मेहकर शहरासह परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या वेगवेगळया योजना व उच्च शिक्षणाची सोय करण्यासाठी प्रयत्नशील आहे असेही कासमभाई यांनी सांगितले दिनांक ०५/०२/२०२६ रोजी पिर मोहम्मद उर्दु हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मेहकर येथे १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. या वेळेस हायस्कूल मध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळेस या कार्यक्रमाचे अध्यक्ष पिर मोहम्मद उर्दु हायस्कूलचे संस्थापक तथा माजी नगराध्यक्ष कासम भाई गवळी हे बोलत होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून या हायस्कूल चे अध्यक्ष नवाज कासम गवळी, उपाध्यक्ष हुसेन गवळी, संचालक हुसेन नौरंगाबादी, अब्दुल दादूवाले, तसेच मेहकर नगर परिषदेचे उपाध्यक्ष मो. अलीम ताहेर, आरोग्य सभापती निलेश सोमण, नियोजन व विकास सभापती अख्तर कुरेशी, महिला व बालकल्याण उप सभापती संजय ढाकरके, स्थायी समिती सदस्य मुजिब खान,नगर सेवक मुजिब हसन कुरेशी,निलेश मानवतकर, वैभव उमाळकर, महेबूब गवळी,इब्राहिम चौधरी आणि वसीम कुरेशी, ख्वाजा गवळी, व पत्रकार उद्धव फंगाळ हे होते. या वेळेस या कार्यक्रमात सर्व प्रमुख मान्यवरांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.दरवर्षी ९ आणि ११वी च्या विद्यार्थ्यांकडून १०आणि १२वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात येतो.मागील २४ वर्षापासून ही परंपरा कायम आहे. या निरोप समारंभ कार्यक्रमात आपले विचार व्यक्त करताना तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कासम भाई यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाच्या तसेच उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला पिर मोहम्मद हायस्कूल चे प्राचार्य जावेद सर तसेच सर्व शिक्षक वृंद आणि ९/१०/११व १२वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्तिथी होती.या वेळेस अहेमद सर तसेच इमरान सर यांनीही विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण संदर्भात मोलाचा सल्ला दिला. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे संचालन मोहम्मद सर तसेच अदिबा या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन मुदस्सर अन्सारी यांनी केले




# मोबाईलच्या अतीवापराने नैराश्य वाढते तर ऑन लाईन शॉपींगही धोकादायक .डॉ सचिन परब . मनोविकार तज्ञ .




कारंजा लाड: डिजीटल वेलनेस खासकर मोबाईल उपयोग या विषयावर कार्यशाळा शाळकरी विद्यार्थी व पालकासाठी होटल महफील इन च्या खुल्या लॉन मधे दि.४ फेब्रुवारी राजी संध्याकाळी अमरावती येथे ब्रम्हा कुमारीज प्रजापिता इश्वरीय विश्व विद्यालय अमरावती केंद्राच्या वतीने विशेष मनोविकार तज्ञ डॉ सचिन परब मुंबई यांनी घेतली .अमरावती ब्रम्हा कुमारीज केंद्राच्या प्रमुख प्रशासिका सिता दिदि यांनी प्रास्ताविक केले . बीके प्रमोद भाई यांनी डॉ . सचिन परब यांचा परीचय करून दिला डॉ सचिन परब यांचे स्वागत ब्रम्हा कुमारीज परिवाराने केले .विद्यार्थी व पालकाशी संवाद साधताना डॉ सचिन परब म्हणाले की मोबाईलचा वापर योग्य कामासाठी केला तर तो उपयोगी आहे मात्र त्याचा अतिवापर व्यसन बनते . सद्याची स्थीती मोबाईल अतिवापराने चिंतामय झाली आहे . इंटरनेटच्या जाळ्यात सर्व फसत आहेत . लहान बालक रडते म्हणून आई त्या बाळाचे हाती मोबाईल देते. घरात प्रत्येकाजवळ स्मार्ट फोन आल्याने एकमेकाशी संवाद संपत चालला आहे . व्हाटस अप फेस बुक; इन्स्टाग्रामने वेड लावल आहे . सोशल मीडीया इलेक्ट्रोनिक्स कोकीन बनला आहे . रात्री मोबाईलच्या वापराने निद्रा दोष होत आहे .मुड चेंज होत आहे . मेमरी लॉस होत आहे एकाग्रता संपून मेंटल हेल्थ; मानसीक स्वास्थ कमजोर होत आहे . थोड्या थोड्या गोष्टीने चिडचिडापण क्रोध वाढत आहे . पपजी रिफायर गेम एडीकक्षण बनत आहे . एआय च्या माध्यमातून सायबर क्राईम घडत आहे . माता भगीनींनी आपला फोटो डिपीवर ठेऊ नये . एआय पुढे गेला आहे . ब्लक मेलींग सारख्या घटणा घडून नैराश्यातून



आत्महत्त्या वाढत आहेत . झोपतांना मोबाईल १० फूटापेक्षा जास्तअंतरावर ठेवा . त्यातून निघनारे रेडीयशन मानवी मेंदू कमजोर करतो आहे डोळ्याचे आजार वाढले आहेत . गाडी चालवतांना मोबईलवर बोलने धोकादाय आहे .आठवड्यातून एक दिवस मोबाईलचा वापर करू नका . मोबाईलच्या अतिवापराने मेंदूवर होणारे परीणाम अत्यंत धोकादायक आहेत . ब्रेन मधून डोपामील निघतो त्यामुळे ब्रेनमधील पाणी सुकल्या जाते . ड्रग अफीन सारखा मोबाईल इफेक्ट करतो आहे.ब्रेन कॅन्सर न्यरो टॉक्सीन सारखे आजार होतात . नऊ दहा वर्षाची मुल अस्लील वीडीओ पाहून बिघडत आहेत त्यामुळे पालकांची जबाबदारी वाढली आहे . रात्रीला मुलांना मोबाईल देऊ नये सायब्रर भामटे अनेकांना ब्लॅक मेल करता आहेत . आर्थिक फ्रॉड होत आहेत . तेव्हा जागरूकता अत्यंत आवश्यक झाली असल्याचे मत त्यांनी व्यक्त करीत आपल्या मुलांचे मानसीक स्वास्थ जपण्यासाठी पालकांनी सतर्क राहणे आवश्यक झाले आहे . कार्यक्रमाचे सुरवातीला अमोल भाई यांनी भारत फीर भरपूर बनेगा सुमंगल गीत गात वातावरण प्रसन्न केले . कार्यक्रमाला पालक बालक विद्यार्थी यांनी गर्दी केली होती खुपछान मार्गदर्शन डॉ सचिन परब यांनी केल्याची चर्चा परीसरात होती . संत गाडगे बाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मिलींद बाराहाते; श्री खोचे संयुक्त धर्मदाय आयुक्त; डॉ विनायक देशपांडे कुलगुर रायसोनी विद्यापीठ; राजेश इंग सहायड धर्मदाय आयुक्त; श्रीमती गुल्हाने उप संचालक अमरावती शिक्षण विभाग; श्री बामनोटे; डॉ .ए टी देशमुख डिन पंजाबराव देशमुख मेमोरियल कॉलेज; डॉ सुधा जैन डीन गोडे मेडीकल कॉलेज; आदर्श रेड्डी; गोपाल मुंदडा; लप्पी भाई जाजोदिया; डॉ स्मीता देशमुख सारख्या महान हस्ती यांनी कार्यक्रमाला हजेरी दिल्याने उमंग उत्साह वाढला . प्रत्येकाला सौगाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली .

# दुसरबिड व राहेरी बु येथील रेती उपसा बद्दल नागरीक संताप




सिंदखेड राजा येथील जवळच असलेल्या रेती घाटावर जे अवैधपणे रात्रंदिवस रिती उत्साह जेसीबी पोकलेन व बोटच्या साह्याने जोरात सुरू आहे मात्र प्रश्नसनाला वेळोवेळी लेखी व तोंडी तक्रार करून कोणत्याच प्रकारे जाग येईना! सिंदखेडराजा तहसीलदार यांना अवैद्य रीती उपसा चालू आहे पण ते मात्र या विषयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येत आहे? यासाठी दुसर बीड, राहेरी बु, जांभोरा, किनगाव राजा ,ताडशिवनी, उगले पांगरी, येथील सर्वच गावातील सरपंच उपसरपंच व काही ग्रामस्थ लोकशाही मार्गाने दि ९/०१/२०२६ रोजी तढेगाव गाव फाट्यावर मरून उपोषणाला बसणार आहे अशी निवेदन इशारा देऊन सिंदखेडराजा यांच्याकडे दोन २/२/२०२६रोजी केलेली आहे या अगोदर सुद्धा सिंदखेडराजा तहसील यांना गट नंबर २१० २१५ व २१८ या गटातून उपसा रद्द व्हावा यासाठी जवळपास शंभर ते दीडशे लोकांनी सह्यासह निवेदन दिले होते त्याची दखल घेण्यात आलेली नाही परंतु रितीघाटावर लिलावधारकांनी २१०, २१५ ,२१८ या तिन्ही गटातून शासनाने फक्त यांना ३४६३ उपसा करण्याकरता परवानगी असताना त्याच गटाच्या लगतच्या गटातून दोन पोकलेन दोन बोट द्वारे रात्रंदिवस अवैद्य उत्खनन सुरू




आहे तरी लेखी तक्रारीची दखल न घेतल्यामुळे उपोषणाच्या दरम्यात काही अनुचित प्रकार घडला तर सर्व जबाबदारी सिदखेडराजा तहसील प्रशासनाची राहिलं असा इशारा ही नागरिकांनी देलेला आहे. निवेदन देणार्यांचे सह्याने पूढील नागरिक दत्तात्रय देशमुख, सुभाष देशमुख, धनंजय विलास देशमुख देशमुख , शिवाजी सरकटे, तात्यासाहेब डोंगरदिवे बालाजी देशमुख, मधुकर नालेगावकर, उद्धव देशमुख ,माणिक देशमुख ,विनायक देशमुख ,उल्हास देशमुख, राजकुमार देशमुख, एकनाथराव देशमुख, रवींद्र बरांडे , सिद्धार्थ जाधव, श्रीराम सरकटे , गुलाब डोंगरदिवे, विलास देशमुख , योगेश सरकटे सुरज सरनाईक अशोक सरकटे इत्यादी अनेक नागरिकांसह ०२/०२/२०२६ रोजी अवैध रेती उपसा विरुद्ध तक्रार निवेदन दिलेले आहेप्रतिक्रिया येथील रेती घाटावर अवैध रेती उपसा चालू असल्या मुळे भविष्यात आम्हा शेतकऱ्यांना पिकांना व गुरेढोरांना पाणी टंचाई निर्माण होणार आहे हे जर असेच चालू राहत असेल तर भविष्यात आम्हाला पाणी टंचाईला सामना करावा लागणार आहे विनायक देशमुख शेतकरी राहेरी बु ** दुसरबिड राहेरी बु येथील रेती घाटावर अवैध पणे पोकलेन व जे सी बि ने व तसेच बोटच्या साह्याने रेती उपसा रात्रंदिवस चालू असुन रेती घाटाच्या जवळच असलेल्या पांगरी उगले, किनगाव राजा, जाभोरा दुसरबिड, राहेरी बु, या गावातील पाणीपुरवठा विहिरी असून रेती उपसा जास्त होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे बालाजी देशमुख सरपंच पती बालाजी देशमुख

# संजीवनी दर्पण पुरस्काराने अशोकराव वानखेडे सन्मानित






डोणगांव – सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या स्थानिक संजीवनी सेवाभावी परिवाराच्या वतीने २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पत्रकार अशोकराव वानखेडे यांना संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी पत्रकार बांधवांना मार्गदर्शन करीत लेखणीच्या माध्यमांतून समाज जागृतीचे महान कार्य करा असे मत रिसोड जि वाशिम तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी व्यक्त केले. दि १ फेब्रुवारी रोजी राजुरकर मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोदबाप्पु देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, सहा पोलीस निरीक्षक संतोष आघाव, भारत मोरे, ठाणेदार अमरनाथ नागरे, अनिल आवटी, अकबरखा पठाण, डॉ गजानन उल्हामाले, राजेंद्र पळसकर , दिपक पाटील आखाडे, बबनराव पळसकर,डॉ नकुल फुले,आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती, स्व डॉ जगदीश बिडवई यांच्या स्मृति प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा ग्रामीण पत्रकार बांधवांना प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश ठेवून पत्रकार बांधवांना संजीवनी दर्पण पुरस्काराने गौरविण्यात येते. या वर्षी पत्रकार अशोकराव वानखेडे,नवल राठोड,सादिक कुरेशी, गजानन देशमुख, रविंद्र वाघ यांना पुरस्काराने सन्मानित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन सुरेन्द्र सिंह चव्हाण यांनी केले. पुरस्कार प्राप्त सर्व पत्रकार बांधवाचे जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद बाप्पु देशमुख, तालुका ध्यक्ष गजानन चनेवार, सिध्देश्वर पवार,कैलास राऊत, डोणगांव पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन गाभणे,राजेश वाघमारे,सुरेश आप्पा फिसके ,रफीक कुरेशी,दत्ता उमाळे, विष्णू आखरे, गणेश पळसकर, अबरार खान मिल्ली, गजानन नरवाडे आदिनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# पालखेड बंधारा येथे महाशिवरात्री निमित्ताने दि.१५ रोजी अखंड हरिनाम सप्ताह






नाशिक दिंडोरी तालुक्यातील पालखेड बंधारा येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही रविवार दि.१५ ते रविवार दि.२२ पर्यंत महाशिवरात्रि निमित्ताने येथील पेरणेश्वर मंदिराच्या प्रांगणात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह काळामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ९ ते ११ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरी किर्तन होणार असून या सप्ताह काळामध्ये महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ह.भ.प.एकनाथ महाराज गोळेसर (सिन्नर) ह.भ.प समाधान महाराज (रिंगणगावकर) ह.भ.प.अभिजीत महाराज देशमुख (आळंदी) हे.भ.प.विष्णु महाराज गोंदे (परभणी) ह.भ.प उत्तरेश्वर महाराज जाधव (वांगी संस्थान) ह.भ.प.केशव महाराज हगवणे (आळंदी) ह.भ.प. दिनेश महाराज माने (लातूर) आदींची हरी कीर्तने होणार असून रविवार दि.२२ रोजी ९ ते ११ ह.भ.प.दिनेश महाराज माने यांचे कीर्तन होणार असून या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महाप्रसादाने होणार आहे. तरी परिसरातील भाविकांनी या हरिकीर्तनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पेरणेश्वर भजनी मंडळ व ग्रामस्थांनी केले आहे.

## सई जरा जपुन....

!

सई जरा जपुन
हा◌ॅटेलाच्या खुर्चीवर
हा वेळ तुझा आहे
का◌ॅलेजच्या बेंचवर

सई जरा जपुन
बगीच्याच्या झाडांतून
हा वेळ तुझा आहे
वर्गाच्या तासातून

सई जरा जपुन
यौवनाच्या स्थितीतून
भविष्याची दशा, दिशा
या मौल्यवान वेळेतून

सई जरा जपुन
तुझ्या निर्णयातून
सावर जरा स्व:ताला
आमिषाच्या पाशातून

सई जरा जपुन
पाल्यांच्या विश्वासातून
वेळ तूझा खुटेल, तूटेल
स्वप्नांच्या पखातून

सौ. चित्रलेखा का. धंदरे (चापले)
राजुरा जि. चंदपुर
मो. 8329202451

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली वैद्यकिय अधिकाऱ्यांची बैठक

## आरोग्य सेवा सहज आणि सुलभ बनविण्यासाठी उपाययोजना करा अधिकाऱ्यांच्या बैठकीत केल्या सूचना








बुलढाणा गोरगरीब जनतेला केंद्रबिंदु मानुन प्रत्येक व्यक्तीला उत्तमातील उत्तम आरोग्य सेवा मिळावी या दृष्टीकोनातुन आरोग्य सेवा सहज, सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातुन कार्यप्रणाली अमंलात आणा अशा सुचना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केल्या आहेत. आयुष मंत्रालय, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय नवी दिल्ली आणि महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रत्येक नागरीकांना दर्जेदार वैद्यकिय सुविधा पोहचविणे आयुष उपचार पध्दतीचा विस्तार करणे आणि आरोग्य सेवा मजबुत करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये बोलतांना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी संबधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या. यावेळी बोलतांना ते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टी नेतृत्वाखाली आम्ही ''स्वस्थ्य भारत, सशक्त भारत'' या संकल्पनेतुन निरोगी महाराष्ट्रासाठी आणि विकसीत भारतासाठी वास्तवात सहज आणि सुलभ आणि सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहोत. वैद्यकिय क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी सुध्दा शासनाच्या विविध योजना तळागळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी स्वयंस्फुर्तीने काम करणे गरजेचे असल्याचे मतही केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत व्यक्त केले. या बैठकी दरम्यान राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, क्षयरोग, किटकजन्य आजार, आयुष आरोग्य मंदिर, आयुष ग्राम यासारख्या योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला आरोग्य मंत्रालयाचे संयुक्त सचिव, श्री.निपुल विनायक, सचिव आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, डॉ.भारती बलकवडे, आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान, डॉ. नितीन अंबाळेकर, संचालक, आरोग्य सेवा, डॉ. रमण घुमराळेकर संचालक आयुष विभाग महाराष्ट्र राज्य व मंत्रालयीन उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

# भावली योजनेला गती देण्याची खा,बाळ्यामामा यांची मागणी






शहापूर ( ठाणे ) (धरणाच्या सिंचन विमोचकाव्दारे पाईप जोडणीस परवानगी मिळावी )

शहापुर तालुक्यातील भावली पाणी योजनेला गती देण्यासाठी भावली धरणाच्या सिंचन विमोचकाव्दारे पाईप जोडणीचे कामाला परवानगी मिळावी अशा आशयाचे भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांचे पत्र त्यांचे सुपुत्र सुमित म्हात्रे यांचे हस्ते जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटिल यांना नुकतेच देण्यात आले आहे. शहापुर तालुक्यात ११० ग्रामपंचायतीचा समावेश असुन ,जल जिवन मिशन अंतर्गत ११७ पाणी योजनांची कामे सुरू आहेत. यापैकी १७ योजना या भावली धरणाच्या पाणी स्रोतांवर अवलंबून आहेत.जल जिवन मिशनच्या ग्रिड पध्दतीने असलेल्या योजनांना भावली धरणाच्या सिंचन विमोचकाव्दारे पाईप जोडणीस परवानगी मिळावी यासाठी काल मंगळवार दि.३ फेब्रुवारी रोजी भिवंडी लोकसभेचे कार्यतत्पर खा. बाळयामामा म्हात्रे यांचे वतीने त्यांचे सुपुत्र सुमित म्हात्रे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देण्यात आले असुन या योजने कडे गांभिर्याने लक्ष वेधले आहे. शहापुर तालुका हा बहुतांशी दुर्गम ,डोंगराळ तसेच भौगोलिक दृष्टया दर्याखोर्यांनी व्यापलेला ग्रामिण तालुका आहे. याठिकाणी दरवर्षी भिषण पाणी टंचाईवर करोडो रूपयांचा आराखडा तयार केला जातो. तसेच टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी लाखो रूपये खर्च होतात.सन २००४ पासुन जल स्वराज्य,भारत निर्माण, राष्ट्रीय पेयजल यासारख्या विविध पाणी योजना मिळुन चारशे पाणी योजना आहेत.तर नव्याने सुरू असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या जल जिवन मिशन अंतर्गत दोनशे पाणी योजनांची कामे सुरू आहेत. यापैकी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मार्फत इगतपुरी तालुक्यातील भावली धरणावरून भावली योजनेचे ७५ टक्के काम झाल्याचे दिसते .मात्र धरणाच्या आवुटलेट मधुन विसर्ग होणार्या पाणी स्रोतावरून पाईप जोडणीचे कामासाठी खा. म्हात्रे यांनी दि.१-७-२०२५ रोजी जलसंपदा विभागाला दिलेल्या पत्रास नकार दिल्याने पुन्हा खासदारांनी दि.२१-७-२०२५ रोजी संबंधित खात्याशी स्वतः संपर्क केला.मात्र भावली याठिकाणी विज प्रकल्पाचे काम प्रस्तावित असल्याने अडचण निर्माण होत असल्याचे सांगितले जाते.परंतु भावली धरणातुन शहापुर साठी पाणी आरक्षण मंजुर असुन आऊटलेट च्या पाणी निसर्गातून पाईप जोडणीस कोणतिही तांत्रिक अडचण नसुन विहीरीतुन पाणी उपसा करण्यासाठी विज बिलाची आवश्यकता लागणार आहेत. तसेच विज बिला अभावी भविष्यात योजना बंद पडण्याची अडचण निर्माण होवु शकते ? असे खा.म्हात्रे यांनी निवेदनात म्हटले आहे. भविष्यात कमी खर्चात, कमी मेहनतीत व कमी वेळात ही योजना पुर्ण करण्यासाठी व शासनाच्या निधीचा अपव्यय टाळण्यासाठी भावली चे सिंचन विमोचकाव्दारे पाईप जोडणीस परवानगी मिळण्याची मागणी करण्यात आली असुन मंत्री महोदयांनी याला सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे.

# श्री संत गजानन महाराज प्रगट दिन यात्रा महोत्सव सुरू




देऊळगाव राजा. श्री संत गजानन महाराज मंदिर, कुंभारी देऊळगाव राजा येथे श्री संत गजानन महाराज प्रगट दिन यात्रा महोत्सव ला १ फेब्रुवारी रोजी प्रारंभ झाला असून ८ फेब्रुवारी रोजी समाप्ती होणार आहे.या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, ह भ प भागवताचार्य महंत श्री स्वामी परमेश्वर यतीजी महाराज भागवत कथा सादर करणार आहे. तसेच ह भ प नकुल महाराज लंके आळंदी, ह भ प उद्बोध महाराज पैठणकर, देऊळगाव राजा, ह भ प भीमाशंकर गुरूजी, परभणी, ह भ पअर्जुन महाराज पळशीकर, ह भ प डॉ अनिरुद्ध महाराज क्षिरसागर, ह भ प संतोष महाराज वणवे, ह भ प बंडोपंत महाराज ढाकणे, परळी यांचे कीर्तन होणार आहे,७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे,८ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ वाजता श्री ची पालखी मिरवणूक श्री संत गजानन महाराज मंदिर येथून निघणार आहे,ह भ प निकम गुरुजी यांचे काल्याचे कीर्तन दुपारी १२ वाजता झाल्यानंतर महाप्रसाद कार्यक्रम ने सप्ताहाची सांगता करण्यात येईल.यात्रा महोत्सव मध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवाभावी मंडळ , कुंभारी परिसर देऊळगाव राजा यांनी केले आहे.



# तांडा वस्ती सुधार योजनेतील सिमेंट रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार !

## माजी आ. संजय रायमूलकर यांच्या यशस्वी मध्यस्तीनंतर उपोषण मागे

दै. विदर्भ सत्यजित
उध्दव फंगाळ
विशेष -बातमी
मेहकर - बुलढाणा

मेहकर देऊळगाव कुंडपाळ येथील तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या २० लक्ष रुपये किमतीच्या सिमेंट रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अपहार झाल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदार व सरपंचावर फौजदारी गुन्हे दाखल करून शासकीय निधी वसूल करण्याच्या मागणीसाठी गेल्या दोन दिवसांपासून ४० बंजारा समाजाच्या महिलांनी लोणार पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते.माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या मध्यस्तीनंतरअधिकाऱ्यांनी चौकशी व कारवाईचे लेखी आश्वासन दिल्यावर ४० बंजारा महिलांनी आज बेमुदत उपोषण मागे घेतले. तांडा वस्ती सुधार योजनेतून देऊळगाव कुंडपाळ येथील बंजारा वस्तीतील अंतर्गत रस्त्यासाठी संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र कंत्राटदारांकडून प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याचा आरोप करत ४० बंजारा महिलांनी २ दिवसापूर्वी पंचायत समिती समोर उपोषण सुरू केले होते. रस्त्याची जाडी, सिमेंट काँक्रीटचे प्रमाण तसेच मुरूम व इतर साहित्याचा वापर नियमबाह्य पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप उपोषणकर्त्या महिलांनी केला. सदर काम पूर्णत्वास गेले असल्याचे दाखवून शासनाकडून निधी उचलण्यात आला असून प्रत्यक्षात काम अत्यंत निकृष्ट असल्याने काही ठिकाणी रस्ता उखडू लागल्याचा दावा महिलांनी केला. या प्रकरणी ठेकेदार व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी संगनमत करून शासकीय विकास निधीचा अपहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची १५ दिवसांच्या आत सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच अपहार केलेला शासकीय निधी संबंधितांकडून वसूल करावा, अशी ठाम मागणी उपोषणकर्त्या महिलांकडून करण्यात येत होती. या आंदोलनाची दखल घेत आज माजी आमदार संजय रायमूलकर यांनी उपोषणस्थळी भेट देत महिलांच्या मागण्या जाणून घेतल्या. त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री खरात , पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. उमेश देशमुख यांच्याशी संपर्क साधून सदर प्रकरणात गांभीर्याने चौकशी करण्याची मागणी केली. शासकीय निधीच्या अपहारासारख्या गंभीर प्रकरणात कोणालाही पाठीशी घालण्यात येऊ नये, अशी ठाम भूमिका संजय रायमूलकर यांनी व्यक्त केली.माजी आमदार संजय रायमूलकर यांच्या मध्यस्थीने व प्रशासनाकडून चौकशीचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ४० बंजारा समाजाच्या महिलांनी आपले बेमुदत उपोषण मागे घेतले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा. बळीराम मापारी, पंचायत समितीचे अधीक्षक रविंद्र मापारी यांच्यासह बंजारा समाजाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, प्रशासनाकडून या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उपोषणकर्त्या महिलांनी दिला आहे. तांडा वस्ती सुधार योजनेचा लाभ प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचावा, अशी अपेक्षा व्यक्त करत या प्रकरणाकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले जात आहे.







# महेश इंटरनॅशनल स्कूल येथे वसंतोत्सव निमित्त

## धम्माल ग्रुप डान्स परफॉर्मन्स

दै. विदर्भ सत्यजित
उध्दव फंगाळ
विशेष -बातमी
मेहकर - बुलढाणा

मेहकर स्थानिक महेश इंटरनॅशनल स्कूल मेहकर येथे दिनांक ३ व ४ फेब्रुवारी२०२६ रोजी वसंतोत्सव अंतर्गत विविध ग्रुप डान्स चे सादरीकरण विद्यार्थ्यांकडून करण्यात आले. हे सर्व डान्स शाळेतील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी ,व काही विद्यार्थिनींनी कोरिओग्राफ केले होते. हे या डान्सचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल .यामध्ये नर्सरी ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थ्यांचे पालक होते यामध्ये तृप्ती जोशी ,प्रणाली दंडे ,विजय वाळूकर ,माधव देशमुख ,गोपाल वायाळ ,माधुरी वायाळ ,रवींद्र मेटांगळे ,कल्याणी कोडापे , पुजा मुळे ,नसीम वसीम परसुवाले ,प्रतीक्षा चनखोरे ,विजय मवाळ ,कांचन तापडिया ,अंजली पळसकर , लाभले तर वसंतोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी प्रियंका नवले ,दिपाली गायकवाड ,स्नेहल बदामे , कोमल निकम ,योगिता मंत्री ,प्रमोद जाधव ,चेतना वाघ , ज्योती बारोटे , शुमायला नाज ,रेणुका जवंजाळ ,पूजा मोरे ,घोंगे छाया धांडे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य ज्योती मंत्री होत्या . वसंतोत्सवाच्या




कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य काशिनाथ गायकवाड ,शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन शाळेतील शिक्षिका श्रद्धा देशमुख व शिक्षक रितेश बिजेवार यांनी केले तर आभारप्रदर्शन सविता जोशी यांनी केले.

# पैठण तालुक्यातील १५३ गावांमध्ये

## २७० मतदान केंद्रे; निवडणूक यंत्रणा सज्ज

दै. विदर्भ सत्यजित
शेख हारूण
विशेष -बातमी
पैठण

पैठण आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पैठण तालुक्यात निवडणूक प्रशासनाने तयारीला वेग दिला असून, तालुक्यातील १५३ गावांमध्ये एकूण २७० मतदान केंद्रांची रचना करण्यात आली आहे. मतदारांना मतदानाचा हक्क सुरक्षित, सुलभ व निर्भयपणे बजावता यावा, यासाठी प्रशासनाकडून सर्व पातळ्यांवर नियोजन सुरू आहे.तालुक्यातील लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती तसेच मतदारांची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील मतदारांना लांब अंतर कापावे लागू नये, यासाठी काही ठिकाणी नवीन मतदान केंद्रांची निर्मिती, तर काही ठिकाणी केंद्रांचे विभाजन करण्यात आले आहे. यामुळे मतदानाची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या असून, वीज, पाणी, रॅम्प, स्वच्छतागृहे तसेच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांवर विशेष भर देण्यात येत आहे. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्तासह सुरक्षा व्यवस्थाही कडक ठेवण्यात येणार आहे.दरम्यान, मतदान केंद्रांवर नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मतदान यंत्रांची तपासणी, मतदार याद्यांचे अंतिम प्रकाशन आदी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण यंत्रणा कामाला लागली आहे. प्रशासनाकडून मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.पैठण तालुक्यातील मतदान केंद्रांची ही व्यापक रचना लोकशाही अधिक बळकट करणारी ठरणार असून, शांततापूर्ण व पारदर्शक निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज असल्याचा दावा तहसीलदार ज्योती पवार यांनी केला आहे.

# उर्दू शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल;

## मुख्याध्यापक सय्यद अबरार हुसेनी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

दै. विदर्भ सत्यजित
शेख हारूण
विशेष -बातमी
पैठण

पैठण /अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने उर्दू शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या सन्मानार्थ आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, लोणी (ता. खुल्दाबाद) येथील मुख्याध्यापक सय्यद अबरार हुसेनी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.उर्दू भाषा व साहित्याच्या संवर्धनासाठी केलेले कार्य, अध्यापन क्षेत्रातील निष्ठा व परिश्रम, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक व नैतिक विकासासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी, ''निष्ठावान व गुणवंत शिक्षक हेच शिक्षणव्यवस्थेचा खरा कणा आहेत,'' असे मत व्यक्त केले.हा सन्माननीय पुरस्कार वितरण सोहळा आझम कॅम्पस, पुणे येथे पार पडला. याचवेळी आयोजित राज्यस्तरीय शैक्षणिक परिसंवाद व पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा. आबिदा इनामदार मॅडम (चेअरपर्सन, एमसीई सोसायटी, पुणे) उपस्थित होत्या.कार्यक्रमास मा. नावेदुल हक साहेब (स्पेशल ऑफिसर, उर्दू बालभारती) आणि मा. मोईनुद्दीन फलाही साहेब (उपप्राचार्य, पुणे कॉलेज) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेचे अध्यक्ष हाजी इल्हाजुद्दीन फारुकी साहेब, पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष व महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सचे अध्यक्ष हाजी जुबेर मेमन साहेब, तसेच संघटनेचे सचिव अब्दुल सलाम इनामदार साहेब यांचीही प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी पैठण येथील काझी कलीमुल्लाह सर, सय्यद शमीमुद्दीन हुसेनी, शहजाद ग्राम सर, सय्यद मिन्हाजुल हक साहेब आणि सय्यद वहाज खतीब यांनी विशेष उपस्थित राहून सय्यद अबरार हुसेनी सर यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातून सय्यद अबरार हुसेनी सर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# सिनेस्टाइल पाठलागानंतर टिप्पर

## चालकांनी रेती सांडऊन पळ काढला,

किरण वाघ
विशेष बातमी
देऊळगाव राजा

.देऊळगाव राजा.. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल महसूल आणि पोलीसांच्या संयुक्त पथकाची कारवाई दोन टिप्परमध्ये होती चार ब्रास रेती अवैध रेती वाहतुकीविरोधात महसूल व पोलीस प्रशासनाने कारवाई तीव्र केल्याने रेती माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. तहसीलदार वैशाली डोंगरजाळ व पोलीस निरीक्षक ब्रह्मागिरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सिनेस्टाइल पाठलाग करून अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई केली. जप्त केलेले टिप्पर पोलीस स्टेशनला न लावता चालकांनी रेती रस्त्यावर सांडऊन पळ काढला. त्यामुळे, दोन्ही टिप्पर चालकांविरुध्द देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात कविता माणिकराव सिरसाट (वय ४७, व्यवसाय महसूल सेवक, रा. देऊळगावमही, ता. देऊळगाव राजा) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी म्हणून लक्ष्मण पवार व गणेश नागरे (रा. सिनगाव जहागीर, ता. देऊळगाव राजा) यांची नावे निष्पन्न झाली आहेत.फिर्यादीत नमूद केल्यानुसार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ४ ते ५ वाजेदरम्यान, सिनगाव जहागीर फाटा ते देळे गव्हाण दरम्यान तहसीलदार यांच्या पथकासोबत अवैध रेती वाहतुकीविरोधात पेट्रोलिंग सुरू असताना विना नंबरचा पांढऱ्या रंगाचा टिप्पर संशयास्पदरीत्या येताना आढळून आला. तपासणी केली असता, त्यामध्ये अवैधरीत्या चोरून नेण्यात येणारी सुमारे चार ब्रास रेती (अंदाजे किंमत २० हजार रुपये) असल्याचे निदर्शनास आले.सदर टिप्पर पोलीस ठाण्यात आणण्याचे आदेश दिल्यानंतर, टिप्पर चालकांनी राजूर रोडच्या दिशेने अतिवेगाने व बेजबाबदारपणे वाहन चालवत, टिप्परमधील रेती रस्त्यावर सांडऊन पळ काढला. यामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेनंतर पोहेकॉ. भास्कर सानप यांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक ब्रह्मागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अवैध रेती वाहतुकीविरोधात प्रशासनाची कारवाई यापुढेही अधिक तीव्र केली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.



# चित्र प्रदर्शनातून दिला व्यसनमुक्तीचा संदेश

## विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ








मेहकर : व्यसन ही समाजाला लागलेली कीड असुन व्यसनाधिनते मुळे अनेक कुंटूब उध्दवस्त व तरुणाई व्यसनाकडे वळत आहे त्यामुळे व्यसनमुक्ती ही काळाची गरज लक्षता घेऊन स्थानिक लोककलावंत फाऊंडेशन व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यामाने तालुक्यातील खंडाळा येथील स्व . भास्करराव शिंगणे विद्यालय येथे एम.ई.एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमात व्यसनमुक्ती चित्र प्रदर्शनी आयोजीत करून व्यसनमुक्तीचा संदेश देणारा आगळा वेगळा कार्यक्रम पार पडला . कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व नंतर व्यसनमुक्ती चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन समाजभूषण पुरस्कार प्राप्त शाहीर ईश्वर मगर यांचे शुभ हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव शरद वानखडे यांनी केले .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विठ्ठल रुक्मिणी शिक्षण संस्थाचे अध्यक्ष वसंतराव मगर हे होत तर प्रमुख अतिथी म्हणून, जयंत वानखेडे , प्रा .वासुदेव गोलाईत , रफिक कुरेशी , प्राचार्य एस. व्ही. गव्हाळे, प्राध्यापक सुनील खिल्लारे प्राध्यापक गंगाधर गाडेकर, अमोल गिऱ्हे, जी.एम.जाधव आदी होते . या वेळी राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना वसंतराव मंगर यांनी व्यसनमुक्त जीवन जगुन आयुष्यात यशस्वी व्हावे असे मत व्यक्त केले तर शाहिर ईश्वर मगर यांनी व्यसनमुक्ती प्रबोधन गीत सादर करून व्यसनाधिनतेपासुन दुर रहावे असे आव्हान केले . जयंत वानखेडे यांनी स्वअनुभव कथन करून कॅन्सरवर विजय मिळविल्याचे सांगुन व्यसन किती घातक आहे हे मार्गदर्शन केले . प्रा गोलाईत यांनी श्रमसंस्कार व व्यसन यावर मार्गदर्शन केले . यावेळी व्यसनमुक्त झालेले मनोज व्यवहारे यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोककलावंत फाऊंडेशन व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयांचे अध्यक्ष रफिक कुरेशी यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार गणेश राऊत यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वी साठी सचिव शरद वानखेडे , गजानन सोनुने , पुरुषोत्तम देवकर , बबन राऊत , शंकर शिंदे, रफिक कुरेशी , गणेश राऊत यांनी अथक परिश्रम घेतले . कार्यक्रमच्या शेवटी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली .

# श्री व्यंकटेश महाविद्याल

## यातजागतिक पाणथळ दिनानिमित्त तज्ज्ञांचे व्याख्यान व पोस्टर स्पर्धा संपन्न







देऊळगाव राजा स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालय, .........., महाविद्यालय, स्वर्गवासी भास्करराव शिंगणे महाविद्यालय साखरखेडा आणि सिंधुताई जाधव महाविद्यालय, मेहकर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक पाणथळ दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या संयोजनात श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या एन.सी.सी. व प्राणीशास्त्र विभागाने पुढाकार घेतला. दरवर्षी जागतिक वेटलँड डे म्हणून साजरा केला जातो. यावर्षी ऑनलाईन पद्धतीने हा कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. गोरे हे होते.या कार्यक्रमात प्रा. डॉ. जी. आर. परिहार (प्राणीशास्त्र विभाग प्रमुख, जे.एन.व्ही. विद्यापीठ, जोधपूर, राजस्थान) यांनी पाणथळ भूमी संवर्धन व जैवविविधतेच्या सद्यस्थितीवर सविस्तर आणि अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. दुसरे व्याख्याते कर्नल ओमेश शुक्ला (कमांडिंग ऑफिसर, १३ महाराष्ट्र बटालियन, एन.सी.सी., खामगाव) यांनी एन.सी.सी. व पर्यावरण संरक्षण या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अतिथींचा परिचय परिचय डॉ. आर. आर. खवल आणि डॉ. ओंकार तनपुरे यांनी करून दिला. तसेच यावर्षीच्या वर . डॉ. एम. आर. तांदळे यांनी आपले प्रभावी विचारमांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट अर्जुन वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. एम. शिंबरे यांनी केले.या निमित्ताने आयोजित पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पाणथळ भूमी संरक्षण, पर्यावरण संतुलन व जैवविविधता या विषयांवर पोस्टर्स सादर करून जनजागृती केली. प्रा. डी. एम. शिंबरे, डॉ. अरविंद कानवटे व डॉ. अमोल जाधव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक कॅडेट अजय सांगळे, द्वितीय क्रमांक विनय बोंडे व तृतीय क्रमांक कॅडेट अर्जुन वाघमारे यांनी पटकावला.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव तसेच व्यवस्थापन प्रतिनिधी सौ. छाया राजे विजयसिंह जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवाजी हायस्कूल चे जिल्हा स्काऊट व गाईड मेळाव्यात सुयश

## एकसंघ राहुन सुप्त गुण व मेहनतीच्या बळावर यशश्री खेचून आणा.... राजेंद्र आखाडे




डोणगांव – दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा राष्ट्रीय सैनिक स्कूल कोलवड जि बुलढाणा येथे बुलढाणा भारत स्काऊट गाईड चा जिल्हा मेळाव्यात श्री शिवाजी हायस्कूल डोणगांवच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत सुयश प्राप्त केले आहे, या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात एकसंघ राहुन सुप्त गुण व मेहनतीच्या बळावर प्रत्येक क्षेत्रात यशश्री खेचून आणावी असे मत संस्थाध्यक्ष राजेंद्र आखाडे यांनी व्यक्त केले. दि ५ फेब्रुवारी रोजी श्री शिवाजी हायस्कूल च्या भव्य प्रांगणात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष राजेंद्र आखाडे, प्राचार्य संजय बाजड, उपप्राचार्य सुरेन्द्र सिंह चव्हाण, पत्रकार सुनील पळसकर,हमीद मुल्लाजी, गजानन खिल्लारी,आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती.सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.प्रास्तावीक मनोगतातून पर्यवेक्षक किरण आखाडे यांनी या उपक्रमाची विस्तृत माहिती दिली.३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या या भारत स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात जिल्ह्यातील सर्व माध्यमीक उच्च माध्यमिक विद्यालय सहभाग नोंदविला. लोकनृत्य, तंबु निरिक्षण, पथसंचालन, शारिरीक प्रात्यक्षिके, शेकोटी व शोभायात्रा अश्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करुन स्काऊट ने जिल्ह्यात प्रथम तर गाईड ने जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकविला, यावेळी आमदार संजय गायकवाड, नगराध्यक्ष सौ पुजाताई गायकवाड, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ,विकास पाटील,नितिन शिंगणे आदिनी या जिल्हास्तरीय मेळाव्यात भेटी देऊन या विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला.या सुयशा बद्दल शिक्षकवृंद व विद्यार्थी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला असून त्यांच्या या सुयशा बद्दल संस्थेच्या वतीने सत्काराचे नियोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभात स्काऊट व गाईड चे विद्यार्थी,त्याचे पालक व शिक्षक वृंद स्काऊटर गजेंद्र माने, अशोक वारकरी, शेषराव चोंडकर, अंकुश डुकरे, प्रविण जाधव, रवींद्र बाजड,राजेश कोडापे व गाईडर कु सिता झगडे यांचा संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र व पुष्पगुच्छाने सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थाध्यक्ष राजेंद्र आखाडे यांनी विद्यार्थी सह पालक वर्गाला बहुमोल मार्गदर्शन करून विविध शालेय उपक्रम राबविण्यासाठी सहकार्याची मागणी केली.या सत्कार समारंभाचे सुत्रसंचलन गजेंद्र माने तर आभार प्रदर्शन अशोक वारकरी यांनी केले.या कार्यक्रमाला पालक वर्गाची उपस्थिती उल्लेखनीय होती.राष्टगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# दिव्यांग विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत ढाणकीच्या विद्यार्थ्यांचे सुयश




महागाव यवतमाळ दि.३ व ४ फेब्रुवारी ला यवतमाळ येथे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय यवतमाळ द्वारा आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांचे जिल्हा क्रीडा स्पर्धा व संस्कृतीक कार्यक्रम पार पडल्या सदर स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की साहेब व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती मंगला मून मॅडम यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. सदर स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सर्वच प्रवर्गातील दिव्यांग शाळेने सहभाग घेतला होता. सर्वच शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वयोगटात वेगवेगळ्या खेळाच्या प्रकारात यश संपादन केले असून ढाणकी येथील.स्व.थावराजी नाईक निवासी दिव्यांग विद्यालय ढाणकी येथील विद्यार्थिनी कु. जयश्री पंजाब मेंडके हिने वयोगट ८ ते १२ मध्ये ५० मीटर धावणे मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.तर २५ मिटर कुबडी धावणे मध्ये कु. स्वरांजली गणेश जाधव हिने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.सोबतच. मधुकरराव नाईक निवासी मुकबधिर विद्यालय ढाणकी या विद्यालयातील विद्यार्थी शिवम दिलीप मडावी याने.१६ ते २१ या वयोगटात ४०० मीटर धावणे मध्ये प्रथम क्रमांक पाठविले आहे.तर. पवन पंडित पावडे याने १२ ते १६ वयोगटात गोळा फेक मध्ये द्वितीय क्रमांक पाठविला आहे.कु. नंदिनी सुदर्शन आडे या विद्यार्थिनीने १६ ते २१ या वयोगटात ४०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक फटकावले आहे. सर्व विजेत्या खेळाडूंचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती मंगला मून मॅडम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात असून .विद्यार्थ्यांच्या या सुमार कामगिरीबद्दल स्व.चांदीबाई शिक्षण संस्थेचे मानद सचिव मा.श्री.एस.एन.पवार साहेब . अध्यक्ष सौ.जनाबाई शेषराव पवार .सदस्य श्री.सुदर्शन भाऊ पवार विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.भोने सर यांनी कौतुक केले असून राज्यस्तरीय साठी शुभेच्छा दिल्या आहे . विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयातील शिक्षक.श्री.शंकर चव्हाण. श्री.आडे सर. श्री.काळे सर. श्री.पाटील सर. श्री.रावते सर श्री डि.एन..जटाळे व श्री एन डी.आडे यांना दिले आहे



# मेहनत हीच यशाची खरी गुरुकिल्ली, जाधव

## दिंडोरी जनता इंग्लिश स्कूलमध्ये १० वी-१२वी विद्यार्थ्यांचा आशीर्वाद समारंभ उत्साहात




नाशिक मेहनत,शिस्त आणि आत्मविश्वास या यशाच्या खऱ्या गुरुकिल्ल्या असल्याचे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक प्रवीण नाना जाधव यांनी केले.दिंडोरी जनता इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आयोजित इयत्ता १० वी व १२वी विद्यार्थ्यांच्या आशीर्वाद समारंभ व वार्षिक गुणगौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.प्रवीण नाना जाधव म्हणाले,१०वी आणि १२वी या विद्यार्थ्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या वळणावरच्या परीक्षा आहेत.या परीक्षा केवळ गुणांसाठी नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याची दिशा ठरवणाऱ्या टप्प्यांपैकी एक आहेत. यश मिळवण्यासाठी बुद्धिमत्तेसोबत सातत्यपूर्ण मेहनत,शिस्त आणि आत्मविश्वास अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.विद्यार्थ्यांनी दररोज ठरवून अभ्यास करावा,वेळेचे योग्य नियोजन



करावे तसेच मोबाईल व सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळून ध्येयावर लक्ष केंद्रित करावे,असे आवाहन त्यांनी केले. गौरव झालेल्या विद्यार्थ्यांचे यश हे इतरांसाठी प्रेरणास्थान असल्याचे सांगत, "हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून त्यामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे कष्ट आणि विद्यार्थ्यांची चिकाटी आहे," असे नमूद करत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब मुरकुटे, उच्च माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष दत्तात्रेय जाधव,ज्येष्ठ सभासद शिवाजी भाऊ जाधव,गणपतराव जाधव, सोमनाथ सोनवणे,ॲड. विलास निरगुडे,मनोज खांदवे, बंडू भाऊ भेरे,वाळू पाटील जगताप, मधुकर जाधव,भास्कर घोलप, शिवाजी बोराडे,प्राचार्य शरद शेजवळ, डी.एड.कॉलेज प्राचार्य डॉ.संजय काळोगे,होरायझन प्राचार्या निर्मला जाधव,उपप्राचार्य उत्तम भरसठ, पर्यवेक्षक डी.के.टोपले,आर.एस. शिंदे,टी.जी.शिंदे,बाबा मोरे, प्राध्यापक विजय विंचूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व नागरिकांनी ईशस्तवनाने झाली. देशपांडे मॅडम व



गीत मंच यांनी ईशस्तवन सादर केले. त्यानंतर विद्यालयाचे प्राचार्य शरद शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी जीवनात केवळ गुण नव्हे तर विविध कौशल्ये, मूल्ये व सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात करावा,असा सल्ला त्यांनी दिला.स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते,असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व बौद्धिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल एकूण २६० बक्षिसांचे वितरण करण्यात आले. राष्ट्रीय, विभागीय,जिल्हा,तालुका तसेच शालेय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ही बक्षिसे देण्यात आली.विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून विद्यालयाच्या गुणवत्तेचा ठसा उमटवला.इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित आशीर्वाद सोहळा हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. यावेळी कॉलेज विभागातील शिंदे मॅडम, चौधरी तसेच माध्यमिक विभागातील श्रीमती एस.एस.गुंजाळ व श्री पी. एस.सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त करत विद्यार्थ्यांना आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.या क्षणी सभागृहात भावनिक व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. दरम्यान,विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संतोष कथार यांची दिंडोरी तालुका शेतकरी सहकारी संघाच्या व्हाइस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल तसेच ज्येष्ठ शिक्षिका मंगल बागुल यांनी शासकीय कर्मचाऱ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत विभागात क्रमांक मिळविल्याबद्दल या दोघांचाही प्रवीण नाना जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.शालेय समिती सदस्य बंडू भाऊ भेरे यांनी नवीन इमारत बांधकामासाठी १ लाख ११ हजार १११ रुपयांचा धनादेश संचालक व प्राचार्य यांच्याकडे सुपूर्द केला.तसेच वाळू पाटील जगताप यांनी ११,५५५ रुपयांची देणगी जाहीर केली.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सरला कदम व नेहा देशमुख यांनी केले,तर आभार प्रदर्शन संतोष कथार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. हा गुणगौरव व आशीर्वाद सोहळा विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घालणारा व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरला.

## मलकापूर पांग्रा येथे स्वअजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली




सिदखेड राजा! येथून जवळच असलेल्या मलकापूर पांगरा येथे चार फेब्रुवारी रोजी स्व. अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आले. भावपूर्ण श्रद्धांजली करिता प्रमुख उपस्थिती म्हणून, सरपंच यादवराव टाले, अविनाश नागरे ग्रामविकास अधिकारी, आनंदा टाले, सुभाष देशमुख, विलास देशमुख, बाळू देशमुख, प्रल्हाद देशमुख, विजय चौरे, भरत देशमुख, शैलेश काकडे, गणेश सोनवणे, कैलास देशमुख, वाजिद पठाण, प्रभाकर वायाळ, विठ्ठल मांजरे, कैलास साळवे, बालाजी टाले ,दिनकर देशमुख तसेच ग्रामस्थ व




संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करू, सर्वांनी फुले अर्पण करून, पाच मिनिट सर्वांनी मौन पाळले नंतर अजित दादा अमर रहे अजित दादा अमर रहे या गरजेने मलकापूर पांगरा दणाणून गेला होता. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी कैलास देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.


## तिवरंग गावात सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल!

### सरपंचांच्या पुढाकारातून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित




महागाव यवतमाळ:- तीवरंग गावाच्या सर्वांगीण विकासासोबतच गावातील नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सरपंच प्रा. सौ. जयश्री सुनील राठोड यांच्या पुढाकारातून गावांतर्गत तसेच ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सीसीटीव्ही () कॅमेरे बसविण्यात आले आहेत.सरपंच पदाच्या कार्यकाळात विविध शासकीय योजनांचा अभ्यास करून गावासाठी जास्तीत जास्त विकासकामे कशी आणता येतील यावर सातत्याने





प्रयत्न करण्यात आले. त्याच धर्तीवर गावातील वाढती वर्दळ, सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन पंधरावा वित्त आयोग अंतर्गत निधी उपलब्ध करून गावांतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.यासोबतच ग्रामपंचायत कार्यालयामध्ये देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्यामुळे प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता वाढणार आहे. विशेष बाब म्हणजे जिल्हा परिषद शाळा व पीएमश्री जिल्हा परिषद शाळा, तिवरंग येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे शाळेतील शिस्त, सुरक्षित वातावरण आणि पालकांचा विश्वास अधिक दृढ होणार आहे.या संपूर्ण उपक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी, कर्मचारी तसेच गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे सरपंचांनी नमूद केले. भविष्यातही गावाच्या सुरक्षितता, शिक्षण व विकासासाठी असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

## शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती केल्यामुळेच पुरस्काराने सन्मान - अब्दुल करीम सालार

### प्रतिकुल परिरिथितीवर मात करून यशस्वी व्हावे - शकील काकर




श्रीरामपूर:जळगांव येथील इकरा कॅम्पस या ठिकाणी काकर समाजातील उच्च शिक्षित प्रतिभावंतांचा मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय भुमिका बजावल्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. काकर समाजातील उच्च शिक्षित प्रतिभावंत व्यक्तींना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांचा सन्मान करण्यासाठी भव्य अशा समारंभाचे आयोजन ईकरा शिक्षण संस्था मोहाडी जळगांव याठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमास डुंगरपूर (राजस्थान) येथून ज्येष्ठ पत्रकार राजूभाई बर्तनवाला, धार (मध्यप्रदेश)येथील शफी नक्षबंदी , इंदौर (मध्य प्रदेश) येथील जाकीर काकर, बुरहानपुर येथील हाजी शफी, मुश्ताक जिलानी, श्रीरामपूर येथील इकबाल इस्माईल काकर सर, छ.संभाजीनगर (औरंगाबाद) येथील नासीर काकर,सरफराज काकर परळी येथील अ.गफ्फार काकर,अचलपूर येथील जमील मास्टर, धुळ्याचे गुड्डूभाई, जावेद काकर , शफिक काकर,अहमद बब्बु (आकोट) पत्रकार इकबाल हनीफ (आर्वी) ,अ.करीम सौदागर, अमरावती येथील मुख्तार काकर,शायर शकील पहेलवान, लोहारी चे मुख्तार काकर, भोकरी वरखेडी येथील सोफियान काकर , सलीम काकर साथी , अब्दुल अलीम



काकर, हाफीज साहब, जळगाव चे अकबर काकर, युनूस बाबुजी,नबु भाई, सत्तार पिरन तौसिफ शरीफ, मुंबईहुन विशेष अतिथी म्हणून शकील सुलेमान काकर () शासकीय अधिकारी आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराण पठण नंतर प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे स्तुत्य, नाते पाक सादर करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काकर समाजाचे प्रदेशाध्यक्ष बिलाल हुसेन काकर होते.ईकरा शिक्षण संस्था चे अध्यक्ष अ.करीम सालार यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.काकर समुदायातील उच्च शिक्षण घेतलेल्या काकर बांधवांचे विविध पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले शकील सुलेमान काकर यांना फखरं - ए - काकर पुरस्कार देवून शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विद्रोही सामाजिक चळवळीचे अध्यक्ष डॉ. सलीम सिकंदर शेख (श्रीरामपूर) हे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी विद्रोही सामाजिक चळवळ व ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्यिक संस्थेच्यावतीने श्रीरामपूरच्या इकबाल इस्माईल काकर सर यांना डॉ. सलीम शेख यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी शकील सुलेमान काकर यांनी स्पर्धा परीक्षाबाबत मोठ्या मोलाचे मार्गदर्शन केले.अ.करीम सालार यांनी सत्कार्थींनी इथेच न थांबता आपल्या समाजातील मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्यास प्रोत्साहित केले. धारचे मौलाना शफी नक्शबंदी, श्रीरामपूरचे इकबाल काकर सर, इंदौर चे पत्रकार जाकिर काकर, नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार इकबाल काकर व परळीचे गफ्फर काकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुयोग्य सुत्रसंचालन व सत्कार आयोजन मुश्ताक करीमी आणी फारूक सर यांनी केले, आभार प्रदर्शन इस्माईल सरांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तौसिफ शरीफ, जय्यान करीमी, रेहान करीमी,ईंतेखाब आलम ,उमर जब्बार व काकर समाजातील सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## घनमोडमध्ये महिलांची धाडसी मोहीम; अवैध दारू साठा जप्त




पांढरकवडा: दिनांक ५ फेब्रुवारीमौजा घनमोड सोसायटी परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात गावातील महिलांनी पुढाकार घेत थेट पोलिसांत धडक देत मोठी कारवाई घडवून आणली. महिलांच्या धाडसामुळे अवैधरित्या साठवून ठेवलेली देशी दारू जप्त करण्यात आली असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गावात उघडपणे देशी दारूची विक्री होत असल्याची माहिती ग्रामस्थ महिलांना मिळाली होती. दारू विक्रीला विरोध करणाऱ्यांना मारहाणीच्या धमक्या दिल्या जात असल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत पोलिस पाटील यांनी पांढरकवडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक लहू तावरे यांना खात्रीलायक माहिती दिली.माहितीची दखल घेत पोलीस निरीक्षक तावरे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश सरदार व पोलीस हवालदार रजनीकांत पाटील यांनी पंचांसह घनमोड येथे धाड टाकली. यावेळी ग्रामस्थ महिलांनी पोलिसांना महत्त्वपूर्ण सहकार्य केले. धाडीत मोठ्या प्रमाणात अवैध देशी दारूचा साठा जप्त




करण्यात आला.या प्रकरणी गणेश भीमराव आत्राम वय ४२ व सौ. संगिता गणेश आत्राम वय ३५ यांच्याविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात कलम ६५ ई महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पुढील तपास सहाय्यक फौजदार विठ्ठल बुरेवार करीत आहेत. गावातील महिलांच्या एकजुटीचे सर्वत्र कौतुक होत आहे.